# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 20 January 2026

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – २० जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०

****

- दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत आज दुसऱ्या दिवशीही राज्य सरकारचे विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार
- नांदेड इथं आयोजित 'हिंद दी चादर' सोहळा जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी समन्वयानं काम करण्याचे सरकारचे निर्देश
- जिल्हा परिषद तसंच पंचायत समिती निवडणुकीत अर्ज भरण्याचा उद्या अखेरचा दिवस
- भाजपचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा
- दिव्यांग प्रमाणपत्र गैरवापर प्रकरणी नांदेड जिल्हा परिषदेचे सात शिक्षक निलंबित

आणि

- बॅडमिंटनपटू सायना नेहवालकडून निवृत्तीची घोषणा

****

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत आज दुसऱ्या दिवशीही राज्य सरकारने विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले. राज्य सरकार आणि बर्कले इथलं कॅलिफोर्निया विद्यापीठ यांच्यात धोरणात्मक सामंजस्य करार करण्यात आला. पाच वर्षांच्या या करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात, महानगर नियोजन आणि शहरी परिवर्तन मजबूत करण्यासाठी शैक्षणिक तसंच संशोधन सहकार्याला चालना मिळणार आहे.

जहाज बांधणी क्षेत्रातल्या योमन कंपनीसोबतही राज्य सरकारने आज सामंजस्य करार केला. ही कंपनी एक हजार ५० कोटी रुपये गुंतवणुकीतून रत्नागिरी इथे जहाजबांधणी उद्योग उभारणार आहे. यातून दीड हजारावर प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे.
क्रॉसरेल या अत्याधुनिक रेल्वे सेवा देणाऱ्या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पॉल डायसन यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भेट घेतली. या भेटीदरम्यान, बदलती जागतिक औद्योगिक स्थिती आणि भविष्यातील दळणवळण क्षेत्रात रेल्वेच्या भूमिकेबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

या परिषदेत काल पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडे चौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. या करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. आगामी दोन दिवसात दावोसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल सोयीसुविधा, फिनटेक, इलेक्ट्रॉनिक वाहनं, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार होणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मुंबईतल्या वाडिया रुग्णालयात अवघ्या दोन वर्षांच्या चिमुकलीवर दुर्मीळ आणि अत्यंत गुंतागुंतीची यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. या बालिकेचं यकृत, साडेचार तास शरीराबाहेर ठेवून, यकृताचा कर्करोगग्रस्त ७० ते ८० टक्के भाग काढून टाकण्यात आला, आणि उर्वरित निरोगी यकृत पुन्हा तिच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आलं. अशा प्रकारची ही भारतातील पहिलीच शस्त्रक्रिया, यशस्वी ठरली आहे.

****

नांदेड इथं आयोजित ‘हिंद दी चादर’ सोहळा जागतिक स्तरावर पोहोचावा, यासाठी सर्व यंत्रणांनी काटेकोर नियोजनासह समन्वयानं काम करण्याचे निर्देश राज्याच्या अल्पसंख्याक विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले आहेत. शीख धर्मियांचे नववे गुरु श्री तेगबहादूर यांच्या साडे तीनशेव्या हौतात्म्य सत्संग वर्षानिमित्त या आठवड्याच्या अखेरीस नांदेड इथं हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीचा मिसाळ यांनी आज दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. स्थानिक स्तरावर

होणाऱ्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असून विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्याचे निर्देशही राज्यमंत्री मिसाळ यांनी दिले.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद तसंच पंचायत समितीची निवडणूक, सिल्लोड तालुक्यात शिवसेना स्वबळावर लढवणार असल्याचं, सिल्लोडचे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं माध्यमांशी बोलत होते.

दरम्यान, जिल्ह्यातील ६३ जिल्हा परिषद गट आणि १२६ पंचायत समिती गणांसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी आतापर्यंत ३४ उमेदवारांनी अर्ज भरले असून १ हजार ३२६ अर्ज खरेदी करण्यात आले आहेत. अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे.

****

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसची सत्ता येणार असून त्यासाठी आवश्यक संख्याबळ जमवल्याच काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. ते आज नागपुरात बोलत होते. भाजप नेत्यांची विधानं म्हणजे हवेतील पतंगबाजी असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.चंद्रपुरात जनतेने आमच्या पक्षाला कौल दिला असल्याने तिथे जनतेला अपेक्षित असा काँग्रेसचा महापौर होणार असल्याचं वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

****

पालघर जिल्ह्यात विविध १२ मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि किसान मोर्चाने काढलेला ७० किलो मीटरचा पायी मोर्चा पालघरला पोहोचला आहे, हे आंदोलनकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. डहाणूचे आमदार विनोद निकोले, किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक ढवळे हे या मोर्चाचे नेतृत्व करत आहेत.

****

भारतीय जनता पक्षाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांनी आज कार्यभार स्वीकारला. नवी दिल्लीच्या भाजप मुख्यालयात पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के लक्ष्मण यांनी अध्यक्ष म्हणून त्यांच्या नावाची आज औपचारिक घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवीन यांचा सत्कार करण्यात आला. नितीन नवीन हे बिहार विधानसभेवर पाच वेळा निवडून आले आहेत, तसंच

बिहार सरकारमध्ये ते गृहनिर्माण आणि कायदा मंत्री म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळलेली आहे. नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत.

****

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांवर आधारित राज्यस्तरीय शुभेच्छा पत्र स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या पाच फेब्रुवारी पर्यंत विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या पत्राला अनुक्रमे चार, तीन आणि दोन हजार रुपये बक्षीस दिलं जाणार आहे.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या सात शिक्षकांनी दिव्यांग प्रमाणपत्राचा गैरवापर केल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी गंभीर गैरवर्तन केल्याचा ठपका ठेवत त्यांना सेवेतून निलंबित केलं.

निलंबन काळात या शिक्षकांना खाजगी व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली असून, त्यांचे मुख्यालय बदलून अन्य पंचायत समित्यांमध्ये करण्यात आले आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांना या शिक्षकांविरुद्ध दोन दिवसांत दोषारोपपत्र सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

****

राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य विधिज्ञ गोरक्ष लोखंडे उद्यापासून तीन दिवस लातूर जिल्ह्याच्या दौरा करणार आहेत. या दौऱ्यात ते जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमध्ये राबवण्यात येणाऱ्या योजनांचा सविस्तर आढावा घेणार आहेत.

****

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातला प्रमुख आरोपी समीर गायकवाड याचा आज पहाटे सांगली इथं मृत्यू झाला. पानसरे हत्या प्रकरणी हत्येचा कट रचल्याचा समीर गायकवाड याच्यावर आरोप होता. या प्रकरणी समीर गायकवाडसह १२ आरोपी होते. त्यातल्या ९ जणांना अटक झाली होती, आणि ४ पुरवणी आरोपपत्रं दाखल करण्यात आली होती. २०१७ मध्ये तो जामीनावर सुटला होता.

****

गडचिरोली जिल्ह्यात आलापल्ली–आष्टी महामार्गावरील दिना नदीच्या पुलावरुन कार नदीत कोसळल्याने एकाच कुटुंबातील दोन जण ठार, तर तिघे गंभीर जखमी झाले. आज दुपारी एक वाजेच्या सुमारास हा अपघात झाला.

****

छत्रपती संभाजीनगर इथे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाला उद्या २१ जानेवारीपासून प्रारंभ होत आहे. शहरातील मौलाना अबुल कलाम सभागृहात सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होणार असल्याचं जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयानं कळवलं आहे.

****

ऑलिंपिक पदक विजेती बॅडमिंटनपटू सायना नेहवालने निवृत्ती जाहीर केली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे गेली दोन वर्ष सायना खेळापासून दूर होती. मात्र आता दुखणं बळावल्यामुळे आपण खेळणं थांबवत असल्याचं तिने जाहीर केलं. सायनाने २०१२ च्या लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक पटकावलं होतं, जागतिक क्रमवारीत अव्वलस्थान मिळवणाऱ्या सायनाने २०१६ साली रियो द जानरियो ऑलिंपिकच्या वेळी गुडघ्याला दुखापत झाल्यानंतरही २०१७च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक आणि २०१८च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

****

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान पाच टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला उद्यापासून प्रारंभ होत आहे. मालिकेतला पहिला सामना नागपूर इथे जामठा क्रीडासंकुलावर होणार आहे. या सामन्यासाठी नागपुरात प्रेक्षक मोठ्या संख्येनं येण्याची शक्यता लक्षात घेता, नागपूर शहर पोलिसांनी वाहतुकीचं चोख जय्यत नियोजन केलं आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रेक्षकांनी मेट्रोचा जास्तीत जास्त वापर करावा, असं आवाहन पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांनी केलं आहे. प्रेक्षकांसाठी मेट्रो स्टेशनपासून क्रीडासंकुलापर्यंत फीडर बसची मोफत सुविधा देण्यात येणार आहे.

****

पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेची आज दुसऱ्या दिवशीची सुरुवात अभिनेते नाना पाटेकर यांच्या उपस्थितीत झाली. पुणे ग्रँड टूरमुळे पुण्याचं नाव जगभर पोहोचत

असून, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जागतिक स्तरावर जात आहे, ही गौरवाची बाब असल्याचं मत नाना पाटेकर यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थींनी आयुष्मान कार्ड तातडीने काढून घेण्याचं आवाहन छत्रपती संभाजीनगरच्या आरोग्य विभागातर्फे करण्यात आलं आहे. नागरिकांनी आरोग्याची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी जवळच्या सेवा केंद्र, सरकारी रुग्णालये किंवा नोंदणीकृत आरोग्य केंद्रांवर जाऊन कार्ड प्राप्त करून घ्यावं असं प्रशासनातर्फे सांगण्यात आलं आहे.

****